
REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 5 | FEBRUARY – 2017

# प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड करून उठलेला –'आक्रोश' : भीमराव गस्ती

डॉ. रीता पाठक
नबीरा महाविद्यालय , काटोल.

भीमराव गस्ती हे महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या सीमारेषेवरील बेरड जमातीचे चित्रण करणारे एक सिद्धहस्त लेखक आहेत. बेरड मधूनं त्यांनी 'बेरड' (रामोशी) जमातीच्या दुःख–यातना शब्दबद्ध केल्या आहेत. 'आक्रोश' हे त्यांचे दुसरे आत्मकथन होयः 'आक्रोश'च्या माध्यमातून चळवळ करून बेरडांना न्याय मिळून देणारा लेखक हा बेरडांसाठी एक दीपस्तंभ आहे. महाराष्ट्र, कर्नाटक सीमा भागातील, बेरड, देवदासी यांना संघटित करून त्यांना आत्मभान प्राप्त करून देण्याचे काम लेखक न डगमगता अखंडपणे करतो आहे. 'आक्रोश' मधून बेरडांच्या वाट्याला आलेलं पशुवत जीवन हे सर्जनशील माणसाला अंतर्मुख करायला लावणारे आहे. या देशातील विकासाची क्षितीजे बेरडांना आपल्यामध्ये सामावून घेताना केव्हाही दिसू शकली नाहीत असा एकूणच सूर 'आक्रोश' मधून येताना दिसतो. माणूस असतानाही बेरडांचा स्वीकार ही व्यवस्था करत नाही. गावातील बहुसंख्य मंडळी बेरडांकडे संशयाने पाहताना दिसते. कुठल्याही अनिष्ट



कृत्यांचा शिक्का बेरडांवर मारला जातो. जंगलातील वृक्षांची तोड वनाधिकाऱ्यांच्या कृपाशीर्वादाने ठेकेदार करतात पण त्याचा गुन्हा मात्र बेरडांच्या माथी मारला जातो. यामुळे त्यांच्या मनामध्ये देशाच्या स्वातंत्र्याविषयी शंका निर्माण होते. पोलीस प्रशासन, राजकीय नेते, गाव पातळीवरील मनुवादी व्यवस्था यांच्या अन्याय, अत्याचारामध्ये चिरडला गेलेला बेरड समाज लेखकाकडे मोठ्याा आशेने पाहतो. आपल्या समाजाचा नेता हा भीमरावच होऊ शकतो असे सांगणारी बहुसंख्य मंडळी आहेत. पण त्याचबरोबर भीमरावच्या कार्यावर ताशेरे ओढणारेही बरेच लोक आहेत. पण या स्वार्थी प्रवृत्तीला भीक न घालता आपले कार्य अगदी सक्षमपणे लेखक करतो आहे. आपल्या स्वार्थासाठी कुणाचाही जीव घेण्यासाठी मागे पुढे न पाहणारा बेरड हा तेवढाच बेडर आहे, हेही आपणास अभ्यासक म्हणून तटस्थपणे राहून स्वीकारावे लागेल. देवदासींकडे वासनाभूत नजरेने पाहणारा समाज, अंधश्रद्धेपोटी त्यांचे जीवन उद्ध्वस्त करणारे पालक, राजकीय दुर्लक्ष या गोष्टीही देवदासींचे स्खलन व्हायला तेवढेच जबाबदार आहेत. देवदासींचे जीवन अगदी विराण आहे पण ही व्यवस्था मात्र जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करते आहे. लेखक मात्र देवदासींना न्याय देण्यासाठी सर्वस्व अर्पण करून प्रयत्नरत आहे. देवदासीना आपल्या 'स्व' त्वाची जाणीव करून देऊन आपल्या हक्कासाठी लढण्याची हिंमत अगदी प्रखरपणे निर्माण करतो आहे. 'आक्रोश' या आत्मकथनातून बेरड समाज, देवदासी प्रथा यावर प्रकाश टाकला आहे.

मानवाला जीवन जगण्यासाठी ज्या मूलभूत गरजांची आवश्यकता असते त्या गरजा बेरडाच्या स्वातंत्र्याच्या पंचेचाळीस वर्षानंतरही पूर्ण होत नाहीत. त्यामुळे हा मानवगट आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासापासून कोसोमैल दूर राहिला. एखादी स्त्री प्रसूतीच्या कळा देत असेल तर तिला दवाखान्यापर्यंत घेऊन जाण्याची सुध्दा सुविधा उपलब्ध नाही. या अवस्थेचे चित्रण करताना लेखक म्हणतो–

"बाळंतपणात अनेक स्त्रीया दगावतात असेही समजते. एखादी गरोदर स्त्री बाळंतपणासाठी अडून बसली तर तिला दवाखान्यात न्यायचे कसे ? पाऊलवाट तर उंच खोल दऱ्यातून, काटेरी झुडपातून, अणकुचीदार धोंड्यातून जाणारी. मग त्या स्त्रीला कसे न्यायचे ? तेव्हा तिचे होणारे हाल पाहून आभाळातील देवही अश्रू ढाळत असावा, असे मला वाटू लागले."[1].

यावरून बेरडांना कोणत्या अवस्थेमध्ये जीवन जगावे लागते याचे अगदी विहंगम चित्र डोळ्यासमोर उभे राहते. जगण्यासाठी खूप हाल–अपेष्टा सहन कराव्या लागतात. तरीही बेरड समाज हे सर्व काही सहन करून जीवनाची वाट अगदी खंबीरपणे चालताना दिसतो. या जगण्याविषयीची तक्रार जवळपास नसल्याचे त्यांच्या एकूणच वागणुकीतून जाणवते पण लेखक मात्र त्यांना आपल्या 'स्व'जीवनाविषयीचे आत्मभान खंबीरपणे निर्माण करून देतो.

बेरड समाजामध्ये मोठ्या प्रमाणात स्वार्थी प्रवृत्ती डोकावत असताना दिसून येतात. अहोरात्र कष्ट करून ज्या बेरड समाजाला लेखक न्याय मिळवून देऊ पाहतो आहे, त्याच्याविरुद्धच कुभांडं रचणारी बेडर माणसे मात्र विचित्रपणे या आत्मकथनातून डोकावताना दिसतात. स्वतःच्या स्वार्थासाठी एखाद्याचे कुटुंब उद्ध्वस्त करण्यासाठी मागे–पुढे न पाहणारी या बेरड जमातीत परिवर्तन घडवण्यासाठी लेखक अखंडपणे प्रयत्नरत दिसतो. बेळगाव जिल्ह्यात एक कलेक्टर येतो. तो बेरड समाजाचा असल्यामुळे लेखक सुखावतो. त्याच्या वाट्याला मात्र निराशाच येते. तो कलेक्टर अगदी स्वार्थी प्रवृत्तीचा असतो. कलेक्टर बेरड जमातीचा असूनही सामाजिक भान असलेला दिसत नाही. याविषयीची प्रतिक्रिया नोंदवताना लेखक म्हणतो–

कलेक्टर मागासवर्गीय! तोही बेरड समाजाचा ! विजापूरजवळील एका गावाचा. बेळगाव जिल्ह्याला जेव्हा तो कलेक्टर म्हणून आला तेव्हा मला वाटते की, आता बेरडांच्या समस्या काही प्रमाणात सुटतील. परंतु झाले उलटेच ! तो आल्याबरोबर पोलिसांचे अत्याचार वाढले. काही कारण नसताना धनट्टी येथील चार बेरडांना पोलिसांनी गोळ्याा घालून ठार केले. त्याची साधी चौकशी या कलेक्टरनी केली नव्हती. उलट गोळ्याा घालण्याचे आदेश याच कलेक्टरनी दिले होते."[2]

स्वतःच्या स्वार्थासाठी कोणाच्याही जिवाची पर्वा न करणारे बेरड लेखकाच्या सुद्धा जिवावर उठतात. बेरड समाजाची सुधारणा करू पाहणारा लेखक दोन वेळा हत्या होता होता वाचतो. ही स्वार्थी प्रवृत्ती बेरडांच्या अंगोअंगी भिनली होती. जो माणूस आपल्या समाजासाठी आपले घर–दार, संसार, मुले, पत्नी या सर्वांना सोडून अखंडपणे कष्ट करीत होता त्याच्याच जिवावर उठणारी ही कद्रू प्रवृत्तीची माणसे मात्र स्वार्थी व विक्षिप्तच वाटतात. त्याचबरोबर आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी कुणाच्याही जिवाची तमा न बाळगणारे हे बेरड विचित्रच वाटतात. आपल्याच जातीतील या लोकांच्या प्रवृत्तीचे मत नोंदवताना लेखक म्हणतो, "स्वतःचे पोट भरून घेण्यासाठी दुसऱ्याच्या पोटावर बेदरकारपणे पाय ठेवायचं काम आणि जगण्यासाठी हाच मार्ग का निवडीत आहेत आमचे लोक ? किती मृत आत्म्यांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे शाप घेणार आहेत हे आमचे लोक ? मी माझ्या मनाशीच प्रश्न करीत पोलीस प्रमुखांच्या कार्यालयातून विषण्ण मनाने बाहेर पडलो."[3] मनाची अशी घालमेल होते. अशा स्वार्थी प्रवृत्तींच्या बेरडांमुळे लेखकाला मनःस्ताप स्वीकारावा लागतो. पण तो

आपल्या कार्यापासून केव्हाच विचलित झाला नाही. देशाला स्वातंत्र्य मिळूनही बेरडांच्या जीवनाला स्थिरता आली नाही. जीवन जगण्यासाठी कायम अनिश्चितताच त्यांच्या वाट्याला आली होती. वास्तविक पाहता सरकार त्यांच्या विकासासाठी कुठलीच ठोस पावले उचलत नव्हते. उलट त्यांच्या वाट्याला राजकीय, सामाजिक व मानसिक कुचंबणाच आली म्हणून ते उद्विग्न होतात. त्यांच्या मनामध्ये या देशातील स्वातंत्र्याविषयी चीड व खंत निर्माण होते.

मग आमी ह्या देशाचे कसे? ह्यो देश आमचा कसा?त्या गांधीबाबानं गोऱ्या सैबास पळवून लावलं आणि ह्यो झेंडा लावला. पर गांधीबाबाचा ह्या स्वातंत्र्य डोंगरातील आम्हा माणसापरीत आलंच न्हाय की? हे कसलं लोकांच राज्य! इथं एकास चुना आणि दुसऱ्यास लोणी अस करुल्यात की? ह्या परीस त्यो गोरा साहीबच बरा व्हता, त्यांच्यावेळी एवढा अन्याय होवूस बी नव्हता."[4]

स्वातंत्र्यातही मनाचा असा उद्वेग होतो आणि असा सूर बेरडांच्या अंतर्मनातून निघतो. याला तेवढीच जबाबदार इथली शासन व्यवस्था आहे. बेरडांच्या स्वातंत्र्याकडून ज्या काही माफक अपेक्षा होत्या त्या पूर्ण न झाल्यामुळे त्यांचा स्वातंत्र्यावरील विश्वास ढळत असलेला दिसतो. स्वातंत्र्याची परिभाषा ही संकुचित स्वरूपात झालेली जाणवते. बेरड समाजामध्ये स्त्रीयांच्या अनुषंगाने जी परिस्थिती दिसून येते ती मात्र जवळपास सर्वच भटक्या– विमुक्तांच्या स्त्रियांच्या वाट्याला येत असलेली अशीच आहे. स्त्रियांनी भडक शृंगार करू नये अशी मानसिकता बेरड समाजामध्ये दिसून येते.

याविषयी लेखक म्हणतो –
"जोगती हैस,जोगवा माणून खाजा"
"छानछोकीत कशाला राहतेस"
"हिच्यामुळे आळीतील पोरं बिघडली"
"डोक्यास सारखं तेलपाणी लावून घेते, विंचरून घेत, येणी घालते, बामणाच्या पोरीवानी नटती रांड कास पाजे हे सगळं?"[5]

बेरड समाजातील स्त्रियांविषयीचा असा दृष्टिकोन यात आहे. स्त्रीने नटून–थटून राहू नये तर तिने अगदी साधे राहावे जेणेकरून पुरुष मंडळींचे लक्ष स्त्रीकडे वेधता कामा नये. पुरुषांच्या म्हणण्यानुसार अगदी सोज्वळपणाने नांदावे.

बेरड समाजातील लोक अगदी विक्षिप्तपणे आपले जीवनक्रमण करताना दिसून येतात. त्यांना आपल्या वागण्यातील बेडरपणाविषयी कुठलीच तक्रार दिसत नाही की, आपल्या विक्षिप्त वृत्तीविषयीची खंत नाही.याविषयी लेखक म्हणतो –

"तुमच्या समाजाचे काही पुढारी काल रात्री मला भेटण्यास आले होते. म्हणाले, तो गस्ती तुम्हाला फसवत आहे असे समजलं. तेव्हा वाईट वाटलं. तेव्हा आम्ही तुमचे पैसे वसूल करून देतो. ती जबाबदारी आमची परंतु तुम्ही एक काम करायला पाहिजे. आताच जाऊन पोलीस ठाण्यात त्याच्याविरूद्ध तक्रार देऊन यायला पाहिजे. बाकीचे मग आम्ही बघून घेतो. असे ते सारखे मला आग्रह करीत होते. गुरुजींनी सांगितले ते ऐकून मी खाली मान घातली."[6]

अशा स्वरूपाची बेरडांची वृत्ती मात्र खिन्न करून सोडणारी आहे. बेरड समाजामध्ये समस्त माणसाच्या अंगवळणी पडलेल्या अशा काही गोष्टी आहेत की, त्यामुळे माणसाच्या अंतर्मनाला हादरा बसेल. त्या समाजाचे प्रतिनिधित्व करत असताना लेखकाला अनेक प्रसंगांना तोंड द्यावे लागले. बेरड ही मागास जमात असताना सुध्दा महार समाजाला कनिष्ठ समजते. ज्येष्ठ पत्रकार बाबा आढाव बेरडांना जो संदेश देतात तोच संदेश लेखक शब्दबद्ध करतो.डॉ. बाबा आढावांनी सांगितले, इकडे बेरडांना पोलिसांचा त्रास होतो, महाराष्ट्रात पारध्यांची

देखील हीच अवस्था आहे. तुमच्यापेक्षा तुमच्या स्त्रिया ह्या अधिक खंबीर आहेत, तुम्ही नावाने बेरड चे 'बेडर' झाला म्हणून काही फरक होणार नाही. उच्चनीचता तुम्ही लोक पाळता. महारांना तुम्ही शिवून घेत नाही. वडर, बेलदार, कब्काडी लोक तुमच्या हातचे खात नाहीत. तेव्हा भेदभाव सोडला पाहिजे. सगळ्या भटक्या विमुक्तांनी एकत्र येऊन आपल्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरूध्द आवाज उठवायला पाहिजे. तरच तुमच्या पाठीमागचा जो त्रास आहे तो कमी होईल."[7] अशा महान संदेशाचा परिणाम या सृजनशील मनावर होतो. त्यातूनच त्यांना सुधारण्यासाठी एक वेगळी दिशा लेखकाला मिळते. समाजामध्ये वावरत असताना देवदासींचा प्रश्न लेखकाच्या निदर्शनास आला. अगदी हालअपेष्टेमध्ये जीवन जगत असणाऱ्या देवदासी व त्यांचे कारुण्यपूर्ण जीवन मनाला हेलावून टाकणारे आहे. यासाठी काहीतरी केलेच पाहिजे व त्यांना न्याय मिळवून दिला पाहिजे हा संकल्प लेखक करतो. महाराष्ट्र –कर्नाटक सीमा भागामध्ये अंधश्रध्दाळू माणसांनी साडेलेल्या देवदासी या दोन वेळचे जेवण सुध्दा घेऊ शकत नाहीत. अशी देवदासींची दारूण परिस्थिती पाहिल्यानंतर कोणत्याही कणवाळू व्यक्तीला दया आल्याशिवाय राहणार नाही.

चिंचण्याची तीस वर्षांची काळीसावळी यशवदा मुसमुसली, घरात मीयाच परकी,
माझं देवीस सोडा म्हणूनशान घरच्याना मीया काय संगीटलं नव्हत! मीया बी इतर आयाबेनीसखं नवऱ्यासंगं सोंसार केली असती की! माझ्या कुंकवाच्या धन्यास मीयाच
कट्ट करून घातली असती. माझ्या पोराबाळांना त्येंचा हक्काचा बाप मिळाला असता
की! पर आता.... आणिती हुंदके देऊ लागली. माझ्याही हदयात चर्रर् झाले

पुन्हाती गदगदत आपली कर्मकहाणी सांगू लागली, "माझं अता पाच पोरं हायीत"

आणि हातचा पंजा दाखविला."[8]

बेरड समाजातील माणसाच्या व देवदासींच्या न्याय्य मागण्यासाठी चाललेला हा एक 'आक्रोश' प्रशासनाला हादरवून सोडणारा आहे. लेखक हा आपल्या समाजातील व्यक्तीवर होणारा अन्यायअत्याचार सहन न करणारा संघर्षशील तरुण–तडफदार, उमदा कार्यकता आहे. बेरड समाजामध्ये ज्या काही रूढी–परंपरा, अंधश्रध्दा,चालीरिती चालतात याचे सचित्र जीवनदर्शन 'बेरड' नंतर 'आक्रोश' मध्ये आलेले आहे. त्याचबरोबर बेरडांच्या शेतीचा प्रश्नही ऐरणीवर अणण्याचे काम लेखकाने मोठ्याा हिंमतीने केले आहे. सर्वसामान्य माणसांमध्ये,जनतेमध्ये असलेली ताकद या शासनव्यवस्थेतील राजकीय माणसांना लेखकाने अगदी परखडपणे दाखवून दिली आहे.

## संदर्भग्रंथ सूची :–


१. भीमराव गस्ती, 'आक्रोश', राजहंस प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती 26 जाने. 1993 पृष्ठ क्र. 24
२. तत्रैव पृष्ठ क्र. 28
३. तत्रैव पृष्ठ क्र. 309
४. तत्रैव पृष्ठ क्र. 147
५. तत्रैव पृष्ठ क्र. 41
६. तत्रैव पृष्ठ क्र. 57
७. तत्रैव पृष्ठ क्र. 59
८. तत्रैव पृष्ठ क्र. 315